दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com
हर हर महादेव
ॐ नमः शिवाय
सर्व शिव भक्तांना महा शिवरात्रीच्या मंगलमय शुभेच्छा !
वर्ष : ०५ | अंक : १८४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१५ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## मुलुंडमध्ये मेट्रो बांधकामावेळी पिलरचा भाग रिक्षावर कोसळला, चार जण जखमी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, मुंबई :** मुंबई मेट्रोचे बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी मोठा अपघात झाला आहे. मेट्रो स्टेशनच्या पिलरमधील सिमेंटचा भाग उंचावरुन खाली कोसळल्याने दुर्घटना घडल्याचे समोर आले आहे. पूर्व उपनगरातील मुलुंड येथे पिलरचा भाग एका रिक्षावर कोसळून तीन ते चार जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. यावेळी बघ्यांची मोठी गर्दी घटनास्थळी जमा झाली. मेट्रोचा पिलर खाली कोसळून झालेल्या अपघातानंतरचा अंगावर



काटा आणणारा व्हिडिओ समोर आला आहे.

**नेमकं काय घडलं?**

मुलुंड येथे मुंबई मेट्रोचे बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी सिमेंटच्या पिलरचा भाग कोसळला. शनिवार १४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.१५ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. मुलुंड पश्चिम भागातील लाल बहादूर शास्त्री रोडवर जॉनसन अँड जॉनसन कंपनीच्या जवळ मुंबई मेट्रोचे बांधकाम सुरु असताना हा प्रकार घडला.

**कसा झाला अपघात?**

एलबीएस मेट्रो स्थानकाच्या बांधकामादरम्यान सिमेंटच्या खांबाचा एक भाग कोसळून खालून जाणाऱ्या रिक्षावर पडला. यावेळी रिक्षातून प्रवास करणारे चालकासह तीन ते चार जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. अग्निशमन दल, पोलिस, मेट्रो कर्मचारी, वॉर्ड कर्मचारी आणि १०८ रुग्णवाहिका सेवा तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. रिक्षा पिलरखाली दबल्यामुळे एक जण काही काळ अडकून पडला होता. मात्र अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने स्लॅब हटवून जखमींना रुग्णालयात दाखल केले. यावेळी घटनास्थळी मोठी गर्दी जमा झाल्याचं पाहायला मिळालं.

**मेट्रो मार्ग चारवर अपघात**

मुंबई मेट्रो ४ या वडाळा–घाटकोपर–मुलुंड–कासारवडवली मार्गे जाणाऱ्या ग्रीन लाइनवरील स्टेशनच्या बांधकामावेळी हा अपघात झाला आहे. ३२.३२ किमीचा एलिवेटेड कॉरिडोअर मुलुंडसह भांडुप, कांजुरमार्ग या एलबीएस रोडवरील स्थानकांची कनेक्टिव्हिटी वाढवत मुंबईतील महत्वपूर्ण व्यावसायिक भागांशी जोडेल. यामुळे मुंबई लोकलवरील ताण कमी होणार आहे. तसेच प्रवासाचा वेळ ६०–७५ मिनिटांवरून ३०–४० मिनिटांपर्यंत कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे

## मुंबई नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडी लवकरच सुटणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१४, कळवा (ठाणे) :** मुंबई नाशिक महामार्गावरील माजिवडा ते वडपे या महत्त्वाच्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम अंतिम टप्प्यात असून मार्च महिन्यात हा मार्ग वाहतुकीसाठी खुला होईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना दिली. ठाण्यातील साकेत पुलाचे काम एक महिन्यात पूर्ण होईल. कळवा–खारीगाव खाडी पुलाच्या रुंदीकरणाचे काम अंतिम टप्प्यात असून तीन ते चार दिवसांत तोही खुला होणार असल्याने ठाणे–भिवंडी दरम्यानच्या वाहतूककोंडीतून दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान ठाणे जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत सन २०२६ – २७च्या वार्षिक योजनांना मंजुरी देण्यात आली. सर्वसाधारण योजना ६६० कोटी, आदिवासी उपयोजना १४० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १०७ कोटी अशा तरतुदींसह सुमारे एक हजार ७०० कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

दरम्यान तरतूद करण्यात आलेला निधी योग्य वेळेत नेमून दिलेल्या योजनांसाठीच खर्च करावा. निधी योग्य ठिकाणी वापरला गेला नाही, तर त्या संबंधित विभागप्रमुखाला जबाबदार धरून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असा इशाराही शिंदे यांनी यावेळी दिला. ग्रामीण भागातील



शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्रे यांच्या सुधारणांसाठी योग्य त्या उपाययोजना राबविण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

तसेच जिल्ह्यातील सर्व महापालिका, नगरपालिका हद्दीतील रस्त्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावीत, अशा सूचनाही बैठकीत करण्यात आल्या. खड्ड्यांमुळे कुठेही अपघात आणि वाहतूककोंडीही होता कामा नये, असे स्पष्ट आदेशही यावेळी शिंदे यांनी दिले.

## महापौर व उपमहापौर पहिल्याच दिवशी ‘ॲक्शन मोडवर’

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** सामान्य गृहीणी असलेल्या संगीता खांडेकर यांनी महापौर पदाचा पदभार स्विकारताच थेट ॲक्शन मोडवर येत शुक्रवार ला पहिल्याच दिवशी त्यांनी चंद्रपूर महानगरपालिकेच्या सर्व विभाग प्रमुखांचा आढावा घेतला. शहरातील सुरु असलेल्या विकासासंबंधी सद्यस्थिती, प्रलंबित प्रकल्पांचा प्रगती अहवाल, तसेच नागरिकांना देण्यात येणाऱ्या मूलभूत सुविधांची माहिती जाणून घेत शहरात पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

बैठकीदरम्यान महापौरांनी पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते दुरुस्ती, प्रकाश व्यवस्था आणि शहर सौंदर्यीकरण या विषयांवर विशेष भर दिला. विशेषत: उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील पाणीपुरवठा सुरळीत व नियमित राहावा, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्दे



श देण्यात आले. महापौरांनी सांगितले की, शहरातील सर्व जलकुंभ व पंपींग स्टेशनची नियमित तुासणी करावी. गळतीच्या तक्रारी तात्काळ दुरुस्ती करुन पाण्याची नासाडी टाळावी, कमी दाबाच्या भागांमध्ये अतिरिक्त टँकरची व्यवस्था करणे, नागरिकांच्यै तक्रारींवर २४ तासात कार्यवाही करावी, जलशुध्दीकरण प्रकल्पाची गुणवत्ता तपासणी नियमित करावी, जेणेकरुन नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणी मिळेल, अमृत योजनेत जी कामे अपूर्ण आहेत ती त्वरेने पूर्ण करण्याचेही निर्देश त्यांनी दिले. यावेळी आयुक्तांनी सर्व विभागांना समन्वयाने काम करण्याचे निर्देश देत विकासकामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला. महापौरांनी स्पष्ट केले की, नागरिकांना सुविधा देणे ही महानगरपालिकेची प्राथमिक जबाबदारी असून पाणी हे जीवनावश्यक असलेयाने पाणीपुरवठा व्यवस्थेत कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने दक्ष राहण्याचे तसेच शासनाच्या योजना प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम आपले आहे ते पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचेही निर्देश त्यांनी याप्रसंगी दिले. यावेळी आयुक्त अकुनूरी नरेश, उपमहापौर प्रशांत दानव, नगरसेवक राहुल पावडे, कवि लोनकर, उपायुक्त संदीप चिद्रवार, मुख्य लेखाधिकारी मनोज गोस्वामी, शहर अभियंता रवींद्र हजारे, सर्व सहायक आयुक्त, सर्व विभागप्रमख उपस्थित होते.

## टाकळी विंचूरमध्ये खळबळजनक घटना! विद्यमान ग्रामपंचायत सदस्य केशव जाधव बेपत्ता

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१४, विंचूर (नाशिक) :** टाकळी विंचूर (ता. निफाड) येथील ४५ वर्षीय विद्यमान ग्रामपंचायत सदस्य केशव यशवंत जाधव हे दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ८ वाजता घरातून कामानिमित्त बाहेर पडले आणि त्यानंतर परतलेच नाहीत. आठ दिवसांचा कालावधी उलटूनही त्यांचा ठावठिकाणा लागलेला नसल्याने कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण असून गावात खळबळ उडाली आहे.

केशव जाधव यांनी लासलगाव गटातून जिल्हा परिषद उमेदवारीची तयारी केली असून त्यांनी लोकसंपर्क ही वाढवला होता. केशव जाधव हे राजकीय व सामाजिक कार्यात अग्रेसर म्हणून ओळखले जात होते. गावातील विविध सामाजिक उपक्रम, सार्वजनिक प्रश्न व स्थानिक घडामोडींमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. सर्वसामान्य नागरिकांमध्ये त्यांचा मोठा संपर्क व वावर होता. तसेच टाकळी विंचूर येथे ‘के के सुपर मार्केट’ नावाने त्यांचे किराणा दुकान सुरू होते. रोजच्या व्यवहारात सक्रिय असलेली व्यक्ती अचानक बेपत्ता झाल्याने नागरिकांमध्ये संभ्रम व तर्क–वितर्कांना उधाण आले आहे.

तक्रारदार कविता केशव जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित दिवशी ते कामानिमित्त बाहेर जात असल्याचे सांगून घरातून निघाले. मात्र त्यानंतर मोबाईलवर संपर्क होत नसल्याने नातेवाईक, मि



त्रपरिवार व ओळखीच्या ठिकाणी शोध घेण्यात आला. तरीही कोणतीही ठोस माहिती न मिळाल्याने दिनांक १३ फेब्रुवारी रोजी लासलगाव पोलीस ठाणे येथे मिसिंग क्रमांक ०९/२०२६ अशी नोंद करण्यात आली आहे. केशव जाधव यांची उंची अंदाजे ५ फूट ५ इंच, शरीरयष्टी मध्यम, रंग सावळा, चेहरा गोल, वाढलेली दाढी अशी ओळख आहे. ते घरातून निघताना पांढरा हाफ शर्ट, पांढरी पँट व काळे शूज परिधान केले होते. त्यांच्या जवळ अँड्रॉईड मोबाईलही असल्याची माहिती आहे.

दरम्यान, संबंधित व्यक्तीबाबत कोणालाही माहिती मिळाल्यास तात्काळ लासलगाव पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सदर प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदीप निचळ करत असून विविध ठिकाणी चौकशी व शोधमोहीम राबविण्यात येत आहे.

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते आभासी पद्धतीने पर्यावरणपूरक ५० इलेक्ट्रिक बसेसचे लोकार्पण

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.१४, नागपूर :** केंद्र सरकारच्या पीएम ई–बस सेवा अंतर्गत नागपूर महानगरपालिकेला मिळालेल्या पर्यावरणपूरक ५० इलेक्ट्रिक बसेसचे लोकार्पण आज १४ जानेवारी २०२६ रोजी पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांच्या हस्ते कोराडी आगार येथे आभासी पद्धतीने करण्यात आले. पी.एम. ई–बस’ सेवा ही नागपूरच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्याच्या दिशेने अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे केवळ प्रवाशांचा अनुभवच सुधारणार नाही, तर ‘ग्रीन आणि सस्टेनेबल मोबिलिटी’च्या स्वप्नालाही गती मिळेल. या बसेसमुळे शहराच्या कार्बन उत्सर्जनात घट होऊन स्वच्छ आणि हरित नागपूरच्या मोहिमेला बळ मिळेल.

मनपाद्वारे कोराडी आगार येथे आयोजित कार्यक्रमात राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, नागपूर मनपा महापौर श्रीमती निता ठाकरे, आमदार संदीप जोशी, आमदार कृष्णा खोपडे, नागपूर मनपा उपमहापौर श्रीमती लिला हाथीबेड, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, नगरसेवक पिंटू झलके, रामभाऊ आंबुलकर, प्रभारी आयुक्त श्रीमती वसुमना पंत, माजी महापौर दयाशंकर तिवारी, उपायुक्त व परिवहन व्यवस्थापक डॉ. मेघना वासनकर, महादुल्याच्या नगराध्यक्ष श्रीमती हेमलता सावजी, उपाध्यक्ष वैशालीताई पखीड्डे, मनपाचे क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, नवी दिल्लीचे टिम लिडर राम पौनीकर यांच्यासह इतर मनपाचे नगरसेवक, जेबीएम कंपनीचे उपाध्यक्ष पुनीत शर्मा, वरिष्ठ व्यवस्थापक सौरभ पांडे, भाजपा जिल्हा महामंत्री अनिल निधान, भाजप कोराडी मंडळ अध्यक्ष ब्रम्हा काळे, सुनील हिरणवार, पियुष आंबुलकर, योगेश लुंगे, नरेंद्र धनोलो, संजय अवचट यांच्यासह अधिकारी व कर्मचारी, स्थानिक नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

## लैंगिक छळ प्रतिबंधासाठी कामाच्या ठिकाणी ‘अंतर्गत समिती’ स्थापन न केल्यास ५० हजार दंड

**अक्षराज : जे. के. पोळ**



**दि.१४, मुंबई :** दहापेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत असलेल्या राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच खासगी आस्थापनांमध्ये महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंधासाठी ‘अंतर्गत समिती’ स्थापन करणे बंधनकारक असून, याचे पालन न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बाल विकास विभागाच्या आयुक्त नयना गुंडे यांनी दिली आहे.

अंतर्गत समिती स्थापन न केल्यास संबंधित मालक किंवा प्रमुखांवर ५० हजार रुपयांपर्यंत दंड ठोठावला जाऊ शकतो. जर ही चूक पुन्हा केली गेली, तर संबंधित आस्थापनाचा परवाना रद्द करणे किंवा दुप्पट दंड आकारण्यात येणार आहे.

महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या कठोर भूमिकेनुसार महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई आणि निवारण अधिनियम २०१३ (पॉश कायदा २०१३) ची प्रभावी अंमलबजावणी राज्यात राबविण्यात येत आहे. स्थापन केलेल्या अंतर्गत समितीची माहिती केंद्र सरकारच्या शी बॉक्स (shebox.wcd.gov.in) या ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. यामुळे तक्रारींचे निवारण आणि देखरेख सुलभ होण्यास मदत होणार आहे.

पॉश (पीओएसएच) कायद्यानुसार, ज्या कार्यालयांमध्ये किंवा आस्थापनांमध्ये १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, अशी सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय कंपन्या, खासगी कंपन्या व उद्योग, स्वयंसेवी संस्था, ट्रस्ट, सोसायटी, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, व्यापारी, औद्योगिक, सेवा व वित्तीय क्षेत्रातील आस्थापने, क्रीडा संस्था, प्रेक्षागृहे, वितरण व विक्री केंद्रे आदिना संस्थांना अंतर्गत समिती स्थापन करणे अनिवार्य आहे.

# पृथ्वीचा मोठा व्याप आणि माणसांचे उपद्व्याप



सूर्य,पृथ्वी,चंद्र आणि सुर्यमालेची निर्मिती होणे ती एक फार मोठी विलक्षण व नैसर्गिक घटना होती. आपण ज्या पृथ्वीवर राहतो त्या पृथ्वीचा व्याप फार मोठा आहे. आपली पृथ्वी सजीवसृष्टी असणारा सुर्यमालेतील एकमेव गृह आहे.पृथ्वीची रचना अतिशय सुंदर आणि तितकीच विलक्षण व विविधतेने नटलेली आहे.पृथ्वीच्या पृष्ठभागावर माती,दगड,खडक,हवा, पाणी,झाडे,पक्षी आणि प्राणी मोठ्या प्रमाणात आहेत.समुद्र,पर्वत ,नद्या,नाले,दऱ्या,हिरवळ आणि तलाव यांच्या विविधतेने पृथ्वीचे सौंदर्य नटलेले आहे.पृथ्वीच्या भूगर्भात खनिजे,मुलद्रव्ये,क्षार, लाव्हा रस मोठ्या प्रमाणात दडलेले आहेत.पृथ्वीवर साधनसंपत्तीची रेलचेल खूप आहे.पृथ्वीचा पसारा आणि व्याप फार मोठा आणि विस्तीर्ण आहे.

पृथ्वीच्या व सूर्यमालेच्या निर्मिती नंतर पृथ्वीवर टप्याटप्याने सजीवांची उत्पत्ती झाली.एकपेशीय प्राणी व बहुपेशीय प्राणी निमर्ण झाले.आजघडीला पृथ्वीवर झाडे, पक्षी,किटक व प्राण्यांची रेलचेल व वर्दळ खूप वाढली आहे.पृथ्वीचा व्यास १२७४२ किलोमीटर आहे. पृथ्वीवर सजीवांच्या वेगवेगळ्या अनेक परिसंस्था आहेत.पृथ्वीच्या पृष्ठभागावर ७१ टक्के पाणी आहे. हे अफाट पाणी अनेक महासागरात सामावले आहे.पथ्वीवर एकूण आठ खंड आहेत आणि अधिकृत व स्वतंत्र असे १९५ देश आहेत.या देशांची भौगोलिक रचना पूर्णतः वेगवेगळी आहे.प्रत्येक देशात एक ठराविक राज्यपद्धती,एक सांस्कृतिक व धार्मिक पद्धती, भाषेची विविधता आणि लोकांचे राहणीमान,वेशभूषा वेगवेगळे आहेत.प्रत्येक देशात वेगवेगळे सण उत्सव साजरे केले जातात.वाढत जाणारी प्रचंड अशी लोकसंख्या आता ८२० कोटींच्या वर पोहचली आहे.असा हा एवढा मोठा डोलारा व अवाढव्य पसारा पृथ्वीवर ऐटीत विराजमान आहे.आणि या सगळ्यांचा मोठा भागीदार आणि साक्षीदार माणूस आहे.पृथ्वीवर मनुष्याने वर्चस्व प्रस्थापित केले आहे.जमीनीपासून समुद्राच्या तळापर्यंत आणि तेथून थेट उंच आकाशापर्यंत माणूस यान,विमान आणि उपग्रहांच्या आधारे भरारी घेत आहे.

परंतु,दुःखाची व खेदाची बाब अशी की सुंदर अशा पृथ्वीवर ताबा मिळवलेल्या माणसांनी पृथ्वीला कुरूप करण्याचा सपाटा लावला आहे.पृथ्वीवरच्या साधनसंपत्तीची लयलूट करून माणसांनी पृथ्वीला नष्ट करण्याचे अनेक उपद्व्याप सुरू केले आहेत.मोठमोठे सिमेंट रस्ते व महामार्ग बनवण्यासाठी बेसुमार वृक्षतोड करून पृथ्वीचे वाळवंट केले जात आहे.एकेकाळी स्वच्छ,नितळ व निळाशार पाण्याचा समुद्र आता गढूळ,दुषित आणि कचरायुक्त झाला आहे.सुंदर पृथ्वीवर कचऱ्याचे मोठमोठे ढीग जागोजागी साचले आहेत.आणि समुद्राच्या पाण्यातही मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा झाला आहे.हे पाहिले की माणसाच्या कृतींची आणि बेसुमार कचरा करण्याच्या कुप्रवृत्तीची लाज वाटते.नद्या व नाले जैविक आणि अजैविक कचऱ्यांनी तुडुंब भरलेले आहेत.जिकडे तिकडे कचराच कचरा अस्ताव्यस्त पडलेला दिसतो.मुंबई सारख्या शहरात सुद्धा रेल्वे लाईनच्या कडेला कचरा पडलेला ठळकपणे दिसतो.

तरी पण आपणांस त्याचे काही वाटत नाही.कचरा निर्माण करणे ही बहुतांश लोकांची आवडीची बाब झाली आहे.

माणसांच्या गैर वर्तनामुळे,चुकीच्या जीवन पद्धतीमुळे आणि वाईट सवयी जडल्यामुळे पृथ्वीवर जलप्रदूषण,वायुप्रदूषण,माती प्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे.त्यामुळे ऋतुचक्रात फार फरक जाणवतो आहे.गेल्यावर्षी भर उन्हाळ्यात मुसळधार पाऊस पडला.ऐन पावसाळ्यात पाऊस हुलकावणी देतो आहे.हिवाळ्यातील थंडगार थंडी आता कमी कमी होत आहे. प्लॅस्टिकच्या कॅरीबॅग्स वापरण्याचा सपाटा सुरू आहे. त्यामुळे प्लॅस्टिकचा कचरा खूप वाढला आहे.झाडांची बेसुमार कत्तल वाढली आहे.माती प्रदूषण वाढल्याने जमीनीचा कस कमी झाला आहे. पाण्याचा वापर वाढलाय,परंतु काही अविचारी लोक पाण्याचे नळ सुरूच ठेवतात. विनाकारण पाणी वाया घालवतात.

खाणकाम व खनिजांच्या वापरासाठी अतिप्रमाणात खोदकाम केले जात आहे.त्यामुळे पृथ्वीच्या भौगोलिक रचनेत बदल होत आहे.एकेकाळी सृष्टी सौंदर्याने नटलेली पृथ्वी कुरूप आणि वाळवंटमय होत आहे.

इथे एक गोष्ट आवर्जून सांगावी वाटते की आपली पृथ्वी जैविक व अजैविक घटकांनी मिळून बनली आहे.झाडे,लता,वेली,पक्षी,प्राणी, समुद्र,नद्या,डोंगर,दऱ्या,हिरवळ या घटकांमुळे पृथ्वी शोभून दिसते, तिचे सौंदर्य वाढते.आपल्या पृथ्वीचा व्याप अवाढव्य आणि विविधतेने नटलेला आहे.तो अबाधित ठेवणे,त्याला जीवापाड जपणे हे माणसांचे परमकर्तव्य आहे.माणसांनी आपला स्वार्थ बाजूला ठेवून पृथ्वीच्या रचनेत ढवळाढवळ करणे तात्काळ बंद केले पाहिजे.पृथ्वी व मनुष्य जातीच्या भल्यासाठी माणसांनी उपद्व्याप सोडून देणे काळाची गरज बनली आहे.

**- बबन गुळवे**

# 'दक्षिण कैलास' शंभू महादेव मंदिर शिखर शिंगणापूर....!!

महाराष्ट्रात अनेक लोकांचे कुलदैवत असलेले शिखर शिंगणापूरचे शंभू महादेव हे एक प्राचीन आणि जागृत देवस्थान आहे. तसेच येथील टेकडीवर असलेल्या शंभू महादेवाच्या विशाल मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी सुमारे १८० मीटर उंचीवर चढून जावे लागते.वाटेत 'खडकेश्वर' आणि 'मांगोबा' मंदिरांचे दर्शन देखील घडते. महादेवाचे हे मंदिर आणि शिंगणापुर गावाबद्दल सांगितले जाते की, याचे निर्माण यादव वंशांचे चक्रवर्ती सिंधनदेव महाराज यांनी केले होते. मंदिराची भिंतीचे बांधकाम दगडाने केलेले आहे. तसेच मंदिर परिसरात पाच मोठे नंदी आहेत. असे सांगतात की, देवगिरीच्या यादव वंशाचे राजा सिंघन येथे येऊन राहिले होते.

शंभू महादेवाचे हे प्राचीन मंदिर सातारा जिल्ह्यात आहे. असे मानले जाते की, शिव-पार्वतीचा विवाह चैत्र अष्टमीच्या दिवशी याच ठिकाणी झाला होता. यासाठी येथील गावकरी दरवर्षी शिव-पार्वतीचा विवाह आयोजित करतात. दरवर्षी चैत्र शु. अष्टमीला शंकर-पार्वती विवाह सोहळा अगदी साग्रसंगीत साजरा केला जातो. पंचमीला हळदीचा कार्यक्रम असतो. या लग्नासाठी एक भले मोठे ५५० फुट लांब पागोटे विणले जाते. ज्या कुटुंबाला हे काम दिले जाते ते कुटूंब पूर्ण वर्षभर यासाठी मेहनत करते. विवाहाच्या दिवशी या पागोट्याचे एक टोक महादेवाच्या कळसाला तर दुसरे टोक अमृतेश्वराच्या देवळाच्या कळसाला बांधतात.

तसेच मंदिरात गर्भगृह, मध्यांतर, सभामंडप आणि नंदी मंडप यांचा समावेश आहे. तसेच हे मंदिर १७ किंवा १८ व्या शतकाच्या आसपास बांधलेले दिसते. येथे शिव-पार्वतीचे स्वयंनिर्मित लिंग आहे. तसेच मंदिर आणि खांबांवर विविध प्रकारची शिल्पे बनविण्यात आली आहेत. त्यावर पशुपती, विष्णू, कृष्ण, गणेश आणि इतर शिल्पे कोरलेली दिसतात. तसेच शिवरात्रीनिमित्त येथे भव्य मेळा भरतो. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविक त्यांच्या कवडिया घेऊन पूर्ण भक्तीने आणि 'हर-हर महादेव'चा जयघोष करत येतात. तसेच प्राचीन काळापासून हे एक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे.




**• मंदिराची पौराणिक आख्यायिका..**

पार्वतीने रुसून लपून बसलेल्या शंकराला अचूक हुडकून काढले आणि पुन्हा जाऊ नये म्हणून चक्क दुसऱ्यांदा जिथे लग्न केले ते हे ठिकाण म्हणजे शिखर शिंगणापूर, तसेच स्वयंभू महादेवाचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. शंकर-पार्वतीच्या विवाहाचे ठिकाण म्हणून शिखर शिंगणापूरला 'दक्षिण कैलास' असे म्हणतात. तसेच इथे असलेल्या डोंगराला शंभू महादेवाचा डोंगर म्हणतात. या डोंगराच्या पायथ्याशी शिंगणापूर गाव आहे. हा डोंगर म्हणजे सह्याद्रीचाच एक फाटा असल्याने डोंगरावर दाट झाडी आहे. महादेवाचे मंदिर याच डोंगरावर आहे. मंदिरात जायला जवळपास ४०० पायऱ्या चढून जावे लागते. या मंदिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मोठ्या घंटा आहेत. या घंटांपैकी एक घंटा ब्रिटिशांकडून मंदिराला मिळाली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या घराण्यामध्ये शिखर शिंगणापूरच्या महादेवाचे अतिशय महत्त्व होते. इथे असणारा तलाव शिवतीर्थ असे म्हणतात. शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी भोसले यांनी १६०० मध्ये बांधला. तसेच या मंदिराच्या पश्चिमेकडे अमृतेश्वराचे हेमाडपंथी मंदिर आहे. मंदिरात चार वेळा पुजा केली जाते. तसेच या महादेवाला अभिषेक करण्यासाठी खालून कावडीत पाणी आणतात. या कावडींमध्ये सगळ्यात मोठी कावड असते ती भुत्या तेल्याची. या कावडीला दोन मोठे मोठे रांजण लावलेले असतात. मग ही कावड वर नेली जाते आणि महादेवाचा अभिषेक होतो. तसेच शंभू महादेव हे मंदिर सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात आहे. पुणे, सातारा, फलटण आणि म्हसवड येथून शिंगणापूरला जाण्यासाठी बसेस उपलब्ध आहे.

**ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो.मासा बेलेवाडी**
**कागल कोल्हापूर**

## प्रेम हे..

प्रेम स्फुरावे मनातून
व्यक्त व्हावे कृतीतून
व्हॅलेंटाईन तू म्हणून
नको फक्त उक्तीतून

पुन्हा येई विरक्तीतून
स्नेहवर्धावे शक्तीतून
प्रेम निर्मळ पुजेसम
कळे जुळे भक्तीतून

सिध्द होई त्यागातून
ते लटक्या रागातून
अंदाज नये डोहातून
निस्पृह अनुरागातून

पाठवलेल्या पत्रातून
आठवल्या चित्रातून
न बोलता व्यक्त होई
अहोरात्र गं गात्रातून

दिखावा नाही वरतून
उसळून यावे आतून
साथ द्यावी जन्मभर
एकमेका मध्ये गुंतून

यौवनजाता हे गळून
तरीही यावे ते जुळून
भंगल्या अपूर्ण स्वप्नां
घ्यायचे सारे जुळवून

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# शिवाची महान रात्र म्हणजेच महाशिवरात्री


महाशिवरात्री म्हणजे शिवाची महान रात्र हा भारतीय आध्यात्मिक संस्कृतीमधील एक महत्वाचा सोहळा आहे. भारतीय संस्कृतीत एके काळी वर्षभरात ३६५ सण साजरे केले जात असत. दुस-या शब्दात सांगायचे म्हणजे त्यांना वर्षातील प्रत्येक दिवस साजरा करण्यासाठी काही ना काहीतरी कारण हवे असायचे. हे ३६५ सण विविध कारणांसाठी आणि जीवनातील विविध उद्देश डोळ्यासमोर ठेऊन साजरे केले जात होते. विविध ऐतिहासिक घटना, विजय किंवा जीवनातील विशिष्ट परिस्थिती. उदा. पेरणी, लावणी आणि कापणी यासाठी ते साजरे केले जात होते. प्रत्येक परिस्थितीसाठी एक उत्सव होता. परंतु महाशिवरात्रीचे महत्त्व वेगळेच आहे.

प्रत्येक चंद्र महिन्यातील १४ वा दिवस किंवा प्रतिपदेच्या आधीचा दिवस शिवरात्री म्हणून ओळखला जातो. वर्षभरात येणा-या १२ शिवरात्रींपैकी फेब्रुवारी-मार्च मध्ये येणा-या महाशिवरात्रीला सर्वात अधिक आध्यात्मिक महत्व आहे. या रात्री पृथ्वीच्या उत्तर गोलार्धाची स्थिती अशाप्रकारे असते की मानवामध्ये नैसर्गिकरित्या ऊर्जेचे एक उधाण निर्माण होते. हा असा दिवस असतो जेव्हा निसर्ग एखाद्या व्यक्तीला त्याच्या आध्यात्मिक शिखराकडे ढकलत असतो. याचाच वापर करून घेण्यासाठी या संस्कृतीमध्ये आपण एक विशिष्ट सण स्थापित केला आहे, जो रात्रभर चालतो. या नैसर्गिक ऊर्जेची वाढ होऊ देण्यासाठी, रात्रभर चालणा-या या उत्सवाचा एक मूलभूत उद्देश म्हणजे आपण रात्रभर आपल्या पाठीचा कणा ताठ ठेवून संपूर्ण रात्र न झोपता जागे राहणे.

जे लोक अध्यात्मिक मार्गावर आहेत, त्यांच्यासाठी महाशिवरात्र अतिशय महत्त्वाची आहे. कौटुंबिक व्यक्ती तसेच जगातील महत्वाकांक्षी लोकांसाठी देखील ती अतिशय महत्त्वाची आहे. कुटुंबात रममाण होणारे व्यक्ती हा दिवस शिवाच्या विवाहाचा उत्सव म्हणून साजरा करतात. जी लोकं अतिशय महत्वाकांक्षी आहेत ते हा दिवस शिवाने त्याच्या सर्व शत्रुंवर मात करून विजय मिळविल्याचा दिवस म्हणून साजरा करतात.

पण संन्यासी अर्थात योगी लोकांसाठी शिव कैलास पर्वतासोबत एकरुप झाल्याचा दिवस आहे. तो पर्वतासारखाच पूर्णपणे अचल म्हणजेच स्थिर झाला. यौगिक परंपरेत शिवाला देव म्हणून पूजले जात नाही तर त्यांना आदिगुरु म्हणजे ज्यांच्यापासून योगशास्त्राची उत्पत्ती झाली ते प्रथम गुरु असे मानले जाते, अनेक सहस्त्र वर्षे ध्यानावस्थेत राहिल्यानंतर एक दिवशी ते पूर्णपणे निश्चल म्हणजे स्थिर बनले, तो दिवस म्हणजे महाशिवरात्री. त्यांच्या सर्व हालचाली थांबल्या आणि तो पूर्णपणे अचल झाला, म्हणून संन्यासी लोक महाशिवरात्रीला निश्चलतेची अर्थात स्थैर्याची रात्र मानतात.

महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्त्व पौराणिक कथांव्यतिरिक्त योग परंपरेमध्ये या दिवसाला आणि रात्रीला इतके महत्त्व दिले जाते. याचे कारण ही रात्र साधकाला उच्च अध्यात्मिक शक्यता उपलब्ध करून देते. आधुनिक विज्ञान अनेक टप्प्यांतून गेले आहे आणि आज अशा टप्प्यावर पोहोचले आहे की जिथे ते आपल्याला हे सिद्ध करून दाखवायला तयार आहे की आपल्याला जीवन म्हणून माहित असलेली प्रत्येक गोष्ट, आपल्याला भौतिक पदार्थ आणि



अस्तित्व म्हणून माहित असलेली प्रत्येक गोष्ट, आपल्याला ब्रह्मांड आणि आकाशगंगा म्हणून माहित असलेली प्रत्येक गोष्ट फक्त एकच ऊर्जा आहे जी लाखो वेगवेगळ्या मार्गांनी प्रकट होते.

समजुती बाजूला ठेवून दिल्या तरीसुद्धा योग परंपरेत हा दिवस आणि रात्र महत्त्वाची मानली जाते. याचे कारण हा दिवस अध्यात्माची ओढ असणा-या व्यक्तींना प्रचंड संधी उपलब्ध करून देतो. आधुनिक विज्ञान अनेक टप्प्यांमधून पुढे गेलेले आहे आणि आज या निष्कर्षापर्यंत पोहोचलेले आहे की ज्याला आपण जीवन असे म्हणतो. आपल्या अस्तित्वाबद्दल माहिती असणारी प्रत्येक गोष्ट, आपल्याला विश्व आणि आकाशगंगा म्हणून माहिती असणारी गोष्ट या सर्व गोष्टी एकच आहेत आणि त्या लक्षावधी मार्गांनी प्रकाशित होतात हे आज सिद्ध झालेले आहे.

प्रत्येक योगीमध्ये हे वैज्ञानिक सत्य म्हणजे अनुभवात्मक सत्यता आहे. योगी या शब्दाचा अर्थ ज्याला या एकरूपतेचा साक्षात्कार झालेला आहे अशी व्यक्ती. अथांगतेची माहिती करून घेण्यासाठी उत्सुक असणे, अस्तित्वातील ऐक्य जाणून घेण्याची उत्सुकता म्हणजे योग. याचा अनुभव घेण्याची संधी महाशिवरात्रीची रात्र आपल्याला उपलब्ध करून देते.

भारतीय संस्कृतीमध्ये कुठल्याही प्राचीन प्रार्थना स्वतःचे संरक्षण करण्याबद्दल किंवा जीवन चांगले घडवण्याबद्दल नव्हत्या. सर्व प्राचीन प्रार्थना नेहमीच हे प्रभू, मला नष्ट कर म्हणजे मी तुझ्यासारखा होऊ शकेन अशा होत्या. म्हणून शिवरात्री जी महिन्यातली सर्वात काळोखी रात्र आहे, ती प्रत्येक मानवासाठी त्याच्या मर्यादांच्या पलीकडे जाण्याची, सृष्टीच्या उगमाची अमर्यादता अनुभवण्याची संधी आहे, जी प्रत्येक मानवामध्ये बीजरुपात उपस्थित असते.

महाशिवरात्री ही एक संधी आणि शक्यता आहे. ती विशाल शून्यता अनुभवण्याची जी प्रत्येक मानवाच्या आत आहे, जी सर्व सृष्टीचा स्रोत आहे. एकीकडे शिव संहारक म्हणून ओळखला जातो. तर दुसरीकडे तो सर्वात कृपाळू म्हणून ओळखला जातो. तो सर्वात श्रेष्ठ दाता म्हणूनही ओळखला जातो. योग पुराणात शिवाच्या कृपाळू स्वभावाबद्दल अनेक कथा आहेत. त्याचा कृपाळूपणा व्यक्त करण्याची पद्धत अद्भुत आणि त्याचवेळी विचित्र आहे. त्यामुळे महाशिवरात्र ही कृपा ग्रहण करण्यासाठी एक खास रात्र आहे. ही शून्यतेची जिला आपण शिव म्हणतो, तिची विशालतेची आपल्याला एका क्षणासाठी तरी जाणीव व्हावी. ही रात्र आपल्यासाठी फक्त जागरणाची रात्र नाही, तर जागृतीची रात्र होवोत हीच सदिच्छा..!

**शब्दस्पर्शी - सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**मो. ७०५७१८५४७९**

## भाजप खासदाराच्या धावत्या रेंज रोव्हर कारला आग

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, नाशिक :** मुंबई-नाशिक महामार्गावर खासदाराच्या धावत्या रेंज रोव्हर कारला आग लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सुदैवाने कारचालकाने दाखवलेल्या प्रसंगावधनामुळे खासदारासह कारमधील सर्व प्रवासी सुखरूप बाहेर पडले असून मोठा अनर्थ टळला आहे. मात्र या आगीत कोट्यवधी रुपयांची रेंज रोव्हर कार ही पूर्णपणे जळून खाक झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजस्थान येथील भाजप खासदार लुंबाराम चौधरी हे वाशिम येथून त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी आले होते. ते रेंज रोव्हर कार (क्रमांक एम एच ०१. डी के ९९७५) मधून हे प्रवास करत होते. सदर कार शहापूर येथील चालक अनिल बबन जाधव (वय ४०) हे चालवत होते. कार गोंदे फाटा परिसरातून जात असताना चालकाला अचानक काहीतरी जळाल्याचा उग्र येऊ लागला. काहीतरी अघटित घडत असल्याचे लक्षात येतात चालक अनिल जाधव यांनी तात्काळ गाडी रस्त्याच्या कडेला उभी केली. कारला आग लागली असल्याचे दिसतात त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता खासदार चौधरी आणि तर सहकाऱ्यांना गाडीतून खाली उतरवल्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. काही मिनिटातच आगीने रौद्ररुप धारण केले आणि कारचा अक्षरश: कोळसा झाला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### महात्मा फुले कृषि विद्यापीठात फुले कृषि महोत्सव-२०२६

#### थेट पीक प्रात्यक्षिके, शिवारफेरी व कृषि प्रदर्शनाचे आयोजन



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१४, राहुरी (अहिल्यानगर) :** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन, आत्मा, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आणि उमेद अभियान जिल्हा परिषद अहिल्यानगर, महाबीज, नाबार्ड, पाणी फाउंडेशन आणि इतर सहयोगी संस्थांच्या सहकार्याने दि. १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी कृषि विद्यापीठाच्या मध्यवर्ती परिसरात फुले कृषि महोत्सव- २०२६ थेट पीक प्रात्यक्षिके, शिवार फेरी व कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे तसेच जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा अहिल्यानगरचे सन्माननीय पालकमंत्री मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित असणार आहे. या फुले कृषि महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय कृषि मंत्री तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रतिकुलपतीदत्तात्रय भरणे यांचे शुभहस्ते होणार आहे. याप्रसंगी वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय कामगार राज्यमंत्री मा.ना.ॲड. आशिष जयस्वाल व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तथा सेवा प्रवेश मंडळाचे अध्यक्ष तुषार पवार उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी राज्याचे कृषि आयुक्त सुरज मांढरे उपस्थित राहणार आहेत. यावेळी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व लोक प्रतिनीधी, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विलास खर्चे यांच्या संकल्पनेतुन साकार झालेल्या कृषि तंत्रज्ञान घरो घरी, समृध्दी येईल गावो गावी या उपक्रमांतर्गत फुले कृषि महोत्सव-२०२६ मध्ये विविध पिकांचे १०० एकर क्षेत्रावर पीक प्रात्यक्षिके, कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रात्यक्षिकांमध्ये ज्वारीचे १६ वाण, कडधान्य, तेलबिया व तृणधान्य पिकांचे २७ वाण, भाजीपाला पिकांचे ३१ वाण, तसेच भरडधान्य, फळपिके, चारापिके, ड्रोन तंत्रज्ञानाचे थेट प्रात्यक्षिके विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर पहावयास मिळणार आहेत. विविध पिकांचे प्रात्यक्षिके भाजीपाला सुधार प्रकल्प, ज्वारी सुधार प्रकल्प आणि कडधान्य सुधार प्रकल्प या प्रकल्पांच्या प्रक्षेत्रावर बघण्यास मिळणार आहे. विद्यापीठ विकसीत तंत्रज्ञान, कृषि निविष्ठा, ड्रोन तंत्रज्ञानाचे प्रदर्शन शेतकर्यांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. प्रदर्शनस्थळी उमेद अंतर्गत विविध बचट गटांचे खाद्यसंस्कृतीचे स्टॉल असणार आहेत. यावेळी मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहाचे उद्धाटन होणार आहे. फुले कृषि महोत्सव-२०२६ हे सर्वांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे असून फुले कृषि महोत्सव-२०२६ सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले राहील अशी माहिती महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे आणि संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी दिली.

### मुदखेड श्री अपरंपार स्वामी मठ संस्थानतर्फे 'महाशिवरात्री व दीपोत्सवा'चे भव्य आयोजन



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१४, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरांतील श्री अपरंपार स्वामी मठ संस्थान व समस्त गावकऱ्यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही महाशिवरात्री व दीपोत्सव २०२६ चे अत्यंत मंगलमय वातावरणांत आयोजन करण्यात आले आहे. दि.१५ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी या कालावधीत शहरांत विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार असून, संपूर्ण मुदखेड शहर दीपमाळांनी उजळून निघणार आहे. श्री अपरंपार मठाचे सेवेधारी ईश्वर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली खालीलप्रमाणे कार्यक्रम पार पडणार असुन यात दीपोत्सव शुभारंभ रविवार, दि.१५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता प.पु. तपस्वी गोवत्स बालयोगी व्यंकटस्वामी महाराज (पिंपळगाव) यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन व **भव्य दीपोत्सव साजरा होणार.**

**महारुद्राभिषेक :** रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी रात्री १०:०० वाजता महादेवाचा अभिषेक संपन्न होईल.

**भजन व शिवजागरण :** सोमवार (१६ फेब्रुवारी) आणि मंगळवार (१७ फेब्रुवारी) रोजी रात्री भक्तिमय भजन व शिवजागरणाचे आयोजन करण्यात आले आहे.

अग्नी प्रज्वलन बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी रात्री ९:०० वाजता चंद्रदर्शन व अग्नी प्रज्वलन होईल.

**पालखी मिरवणूक व महाप्रसाद :** गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी पहाटे ४:०० वाजता (ब्रह्ममुहूर्तावर) पालखी मिरवणूक व अग्नी पूजा होईल. त्यानंतर सकाळी ११:०० वाजता सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

दीपोत्सवाच्या वेळी रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी दिवे लावावेत जेणेकरून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना येण्या-जाण्यासाठी अडचण होणार नाही, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

# डोंबिवलीकरांची लोकलच्या गर्दीपासून होणार सुटका

## लवकरच ठाण्यासाठी नवीन बससेवा सुरू



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१४, कळवा (ठाणे) :** मध्य रेल्वेवरील दादर आणि ठाण्यानंतर सर्वात जास्त गर्दीचे स्थानक म्हणजे डोंबिवली. वाढत्या लोकसंख्येमुळे रेल्वेने कितीही गाड्या वाढविण्याचे प्रयत्न केले तरी गर्दीवर नियंत्रण आल्याचे मात्र अद्याप तरी दिसून येत नाही. मध्य रेल्वेतील याच गर्दीच्या जीवघेण्या प्रवासामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न देखील पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. काही दिवसापूर्वीच्या कळवा मुंब्रा दरम्यानच्या रेल्वे अपघाताच्या आठवणी ताज्या असतानाच पुन्हा एकदा कळवा मुंब्रा दरम्यान एका कॉलेज विद्यार्थ्याचा परीक्षेला जाताना लोकल मधून पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

दरम्यान याच पार्श्वभूमीवर आता डोंबिवली ते ठाणे दरम्यान तातडीने पर्यायी बससेवा सुरू करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश मोरे यांनी लक्ष देत पालिका आयुक्तांची भेट घेऊन डोंबिवली ते ठाणे बससेवा सुरू करण्याबाबत चर्चा केली. पालिका आयुक्तांनी सकारात्मक भूमिका घेत बससेवा सुरू करण्याचे आश्वासन दिले.

याबाबत आमदार मोरे पत्रकारांशी बोलताना म्हणाले, डोंबिवलीकरांना ठाणे शहरात जाण्याकरिता रेल्वेच्या गर्दीतून जाण्याची गरज भासणार नाही. डोंबिवली पश्चिमेकडील शास्त्रीनगर रुग्णालयजवळ ते ठाणे आणि दोन टाकी ते ठाणे शहर अशी परिवहन बससेवा सुरू होणार आहे.

आपल्या मागणीचा विचार करून बससेवा सुरू करणार असल्याने पालिका आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड यांचे आभार मानले. डोंबिवली ते ठाणे अशी बससेवा सुरू होणार असल्याने आता ठाणे शहरापर्यंतचा प्रवास सुखकर होणार आहे. तिकीट दराबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

सकाळच्या दरम्यान डोंबिवली रेल्वे स्थानकावर प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. डोंबिवली ते ठाणे रेल्वे स्थानकादरम्यान रेल्वे गाडीतून पडून अनेक अपघात झालेत.

मात्र आता डोंबिवली ते ठाणे परिवहन बससेवा सुरू होणार असल्याने डोंबिवली, कोपर, दिवा, मुंब्रा, कळवा आणि ठाणे रेल्वे स्थानकादरम्यान प्रवाशांची संख्या काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे. या स्थानकादरम्यान रेल्वे अपघातांवर नियंत्रण येईल, असे डोंबिवलीकर म्हणत आहेत. दरम्यान ही बससेवा लवकरात लवकर सुरू व्हावी.

अशी मागणी स्थानिक नागरिकांकडूनही होत आहे. प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेतल्यास लोकलवरील ताण काही प्रमाणात कमी होईल आणि प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित होऊ शकेल.

# भाजी विक्रेत्या महिलांच्या अडचणींवर तात्काळ उपाय

## आ. मुनगंटीवार यांच्या सूचनेनंतर महापौर-उपमहापौर यांची त्वरित पाहणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या संवेदनशील व तत्पर भूमिकेमुळे भाजी विक्रेत्या महिलांची प्रसाधनगृहाची समस्या सोडविण्यासंदर्भात ठोस पाऊल पडले आहे.

आ. मुनगंटीवार यांनी दिलेल्या सूचनेनंतर चंद्रपूरच्या नवनियुक्त महापौर व उपमहापौरांनी प्रत्यक्ष भेट देऊन यावर उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे भाजी विक्रेत्या महिला तसेच स्थानिक नागरिकांनी आमदार मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत. गोलबाजारसमोरील टिळक मैदान परिसरात भाजी विक्री करणाऱ्या महिलांना प्रसाधनगृहाची मोठी अडचण भेडसावत होती.



या समस्येबाबत अनेक महिलांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे मागणी केली होती. याची दखल घेत आ. मुनगंटीवार यांनी महापौर संगीता खांडेकर आणि उपमहापौर प्रशांत दानव यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार गुरुवार, दि.१३ फेब्रुवारीला दोघांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देत महिलांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ सुसज्ज प्रसाधनगृह उभारण्याचे निर्देश दिले. महिलांच्या मूलभूत गरजांकडे लक्ष देत नवनियुक्त महापौर आणि उपमहापौरांनी घेतलेल्या या निर्णयाचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

या पाहणी दौऱ्यात महामंत्री महापौर संगीता खांडेकर, उपमहापौर प्रशांत दानव, डॉ. मंगेश गुलवाडे, महिला महामोर्चा अध्यक्ष छबुताई वैरागडे, नम्रताताई ठेमस्कर, बंडू गौरकार, सुनीता जयस्वाल, सविता सरकार, कल्पना बागुलकर, सुषमा नागोसे, धनराज कोवे, आशा आबोजवार, स्वच्छता अधिकारी, महानगरपालिका अभियंता आदींची उपस्थिती होती. गोलबाजार परिसरात दररोज मोठ्या संख्येने भाजी विक्रेत्या महिला व्यवसाय करतात. मात्र, मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः शौचालयाच्या सुविधेअभावी महिलांना गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याने त्यांनी मागणी केली होती.

या मागणीची दखल घेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी तातडीने महापौर आणि उपमहापौरांना आवश्यक निर्देश दिले. त्यानुसार महापौर संगीता खांडेकर आणि उपमहापौर प्रशांत दानव यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह स्थळाची पाहणी करून महिलांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी समजून घेत सुसज्ज व स्वच्छ प्रसाधनगृह उभारण्याचे आदेश देण्यात आले.


# सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयात मराठी विश्वकोश नोंदलेखन कार्यशाळा संपन्न

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१४, खंडाळा (सातारा) :** मराठी भाषा विभाग,महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,कार्यालय वाई व खंडाळा येथील सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय,मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विश्वकोश नोंदलेखन कार्यशाळा नुकतीच खंडाळा येथील सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयात संपन्न झाली. प्रारंभी सर्व मान्यवरांचा महाविद्यालयाच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.

कार्यशाळेचे उदघाटन खंडाळा विभाग शिक्षण समितीचे सचिव संजीव(अनिरुद्ध) गाढवे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी शुभेच्छा देताना संजीव गाढवे म्हणाले-मराठी भाषेचे वैभव अबाधित असून तिच्या संवर्धन आणि संशोधनासाठी ही कार्यशाळा दिशादर्शक ठरेल. कार्यशाळेचा उद्देश सांगताना अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.प्रदीप मेंढापुरे म्हणाले सुशीला शंकरराव गाढवे महाविद्यालयाच्या मराठी विभागप्रमुख डॉ.प्रतिभा पाटणे यांनी विश्वकोश नोंदलेखन कार्यशाळा घडवून आणण्यासाठी विशेष परिश्रम घेत,विद्यार्थी,प्राध्यापक आणि मराठी भाषेत संशोधन करणाऱ्या प्रत्येकाला ही कार्यशाळा उपयोगी ठरेल.

प्रथम सत्रात विश्वकोश परिचय याबद्दल माहिती देताना मराठी विश्वकोश कार्यालयाच्या संपादकीय सहाय्यक पल्लवी गायकवाड म्हणाल्या-मराठी विश्वकोश वाचकांमध्ये सर्वसामान्य वाचकवर्ग असून अभ्यासू संशोधकांना मराठी भाषेसोबत सर्वच भाषेचे साकल्याने ज्ञान मिळावे. म्हणून विश्वकोश नोंदलेखन केली जाते मराठी विश्वकोशाचे २० खंड संकेतस्थाळावर उपलब्ध आहेत अशी माहिती दिली. द्वितीय सत्रात विश्वकोश नोंदलेखन अचूकता याबद्दल मार्गदर्शन करताना डॉ.प्रतिभा पाटणे म्हणाल्या-नोंदलेखन करताना लेखकाने वाड्मयचौर्यापासून दूर राहून खरेपणा बिनचूकपणा महत्वाचा आहे.नोंद लेखन करताना संबंधित पुस्तके आणि संदर्भग्रंथाचा



आधार घ्यावा असे आवाहन केले अंतिम सत्रात नोंद लेखन स्वरूप यावर बोलताना विद्याव्यासंगी सहाय्यक प्रीती साळुंखे-सकुंडे म्हणाल्या- विश्वकोश नोंदीचे स्वरूप लघु,मध्यम व दीर्घ असते.लेखनावेळी शब्दांची मर्यादा यासोबत प्रस्तावना, सारांश, संदर्भ स्पष्टीकरण आणि आशय महत्वाचा असतो. यासाठी लेखन करताना प्रमाणबद्धता असावी अशी माहिती दिलीकार्यशाळेचे सूत्रसंचालन इतिहास विभागप्रमुख प्रा.प्रतिक्षा माने यांनी केले. आभार प्रा.शर्मिला सावंत यांनी मानले. यावेळी अकोला येथे पार पडलेल्या शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर राज्यस्तरीय आव्हान आपत्ती व्यवस्थापन शिबीर-२०२६ मधील उल्लेखनीय कामगिरीबद्दल कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रतिभा पाटणे समवेत विद्यार्थी प्रतिनिधी गौरी पवार व आर्यन जगताप तसेच बहाई अकादमी, पाचगणी आयोजित राज्यस्तरीय नेतृत्व विकास शिबीर-२०२६ मध्ये सहभागी विद्यार्थी विवेक सोनवलकर या सर्वांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यशाळा यशस्वीतेसाठी महाविद्यालय सर्व शाखा प्राध्यापक,विद्यार्थी आणि कार्यालयीन कर्मचारी वृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.

# तालुकास्तरावर वन्यजीव संरक्षणासाठी समित्यांची स्थापना; सर्पमित्रांना मिळणार अधिकृत स्थान

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१४, नागपूर :** महाराष्ट्र शासन यांच्या वतीने तालुकास्तरावर वन्यजीव संरक्षण आणि पर्यावरण संवर्धन अधिक प्रभावी करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. आमदारांच्या अध्यक्षतेखाली विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून या समित्यांमध्ये अशासकीय सदस्यांचाही समावेश करण्यात आला आहे.

या समित्यांमध्ये तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी सचिव म्हणून कार्यरत राहणार असून महसूल विभागासह इतर तालुकास्तरीय अधिकारी सदस्य म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. विशेष म्हणजे वन्यजीव प्रेमी, सर्पमित्र आणि प्राणी मित्रांना या समित्यांमध्ये महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. प्रधान मुख्य वनरक्षक कार्यालय, महाराष्ट्र

राज्य यांच्या माध्यमातून चार विविध समित्यांचा समावेश असलेला शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे वन्यजीव रक्षक आणि सर्पमित्रांना अधिकृतरित्या काम करण्यासाठी बळकटी मिळणार असून त्यांच्या कार्यातील अडथळे कमी होण्यास मदत होणार आहे.

राज्यात अनेक सर्पमित्र व वन्यजीव रक्षक निस्वार्थ भावनेने सेवा देत आहेत. मानवी वस्तीत आढळणारे साप व इतर वन्यजीव सुरक्षितपणे पकडून त्यांना नैसर्गिक अधिवासात सोडण्याचे कार्य ते सातत्याने करीत आहेत.

तालुका स्तरावर वनविभाग, महसूल विभाग आणि लोकप्रतिनिधी यांच्या माध्यमातून गठीत समित्यांमध्ये सर्पमित्रांना आरक्षित जागेनुसार अशासकीय सदस्य म्हणून सन्मानपूर्वक स्थान देण्यात यावे, अशी मागणी होत आहे. यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यास मदत होईल तसेच पर्यावरण संवर्धनाला चालना मिळेल, अशी माहिती वर्ल्ड फॉर नेचरचे जिल्हाध्यक्ष नागपूर शहर दद्दू गणवीर यांनी दिली.

# संकटात शोधली संधी! द्राक्ष बागेत 'मल्टी-क्रॉपिंग'चा यशस्वी प्रयोग



## देवगावच्या पगार बंधूंची गरुडझेप

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१४, विंचूर (नाशिक) :** यावर्षी निसर्गाच्या लहरीपणाचा आणि अतिवृष्टीचा मोठा फटका द्राक्ष बागांना बसला. वर्षभर पोटच्या लेकरासारख्या जपलेल्या बागा हातच्या गेल्याने अनेक शेतकरी हवालदिल झाले आहेत. मात्र, देवगाव फाटा (ता.निफाड) येथील प्रयोगशील शेतकरी साहेबराव नारायण पगार आणि भाऊसाहेब नारायण पगारयांनी या संकटाचे रूपांतर संधीत केले आहे. द्राक्ष बागेतच भाजीपाल्याचे आंतरपीक घेऊन त्यांनी 'बहुफसली' शेतीचा एक नवा आदर्श परिसरातील शेतकऱ्यांसमोर ठेवला आहे.

**नियोजनाची यशस्वी गाथा; द्राक्ष बागेत वांगी आणि टोमॅटोचा बहर**

पगार बंधूंनी आपल्या दोन एकरएस.एस.एन द्राक्ष बागेतऑक्टोबर छाटणीनंतर अपेक्षित उत्पादन न मिळाल्याने तातडीने निर्णय घेतला. रिकाम्या हाताने न बसता त्यांनी नोव्हेंबरमध्ये एका एकरात 'गॅलन' तर दुसऱ्या एकरात 'पंचगंगा' जातीच्या वांग्यांची लागवड केली.

**गॅलन वांगी :**

दिवसाआड १०० क्रेट उत्पादन मिळत असून, एकरी ५ ते ६ लाखांचे उत्पन्न अपेक्षित आहे.

**पंचगंगा वांगी :**

३५० ते ४०० रुपये प्रति क्रेट दर मिळत असून, यातून ४ लाखांच्या उत्पन्नाची आशा आहे.

**टोमॅटो प्रयोग :**

दीड एकर बागेत 'विरांग' जातीच्या उन्हाळी टोमॅटोची लागवड केली असून, पीक सध्या बहरात आहे.

**कमी खर्चात जास्त नफा; 'जुगाड' नव्हे, आधुनिक तंत्रज्ञान!**

पगार बंधूंच्या या प्रयोगाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी उपलब्ध साधनसामग्रीचा चपखल वापर केला:-

**ठिबक सिंचनाचा वापर :**

द्राक्ष बागेच्याच ठिबकचा वापर केल्याने पाणी आणि खत व्यवस्थापन एकत्रित झाले, ज्यामुळे अतिरिक्त खर्च वाचला.

**मजुरी आणि मशागत बचत :**

द्राक्षाच्या दोन वेलींमधील मोकळ्या जागेचा वापर केल्याने वेगळी मशागत करावी लागली नाही.

**तारांचा आधार :**

द्राक्ष बागेच्या लोखंडी खांब आणि तारांचा आधार घेऊन दीड एकरातभोपळ्याचीलागवड केली आहे. द्राक्षाला माल आला नाही म्हणून हताश न होता आम्ही पर्यायी पिकांचा विचार केला. योग्य नियोजन केल्यास कोणतेही संकट संधी बनू शकते, हेच आम्हाला सिद्ध करायचे होते.'

**– साहेबराव पगार, प्रयोगशील शेतकरी**

**कृषी विभागाकडून कौतुक**

निफाडचे तालुका कृषी अधिकारीसुधाकर पवारयांनी पगार बंधूंच्या या प्रयोगाचे कौतुक केले आहे. अतिवृष्टीमुळे द्राक्ष शेती संकटात असताना आंतरपीक घेतल्यास आर्थिक जोखीम कमी होते.

पगार बंधूंचा हा पॅटर्न इतर शेतकऱ्यांसाठी नक्कीच दिशादर्शक ठरेल, असे त्यांनी नमूद केले.

**महत्त्वाचे मुद्दे एका दृष्टिक्षेपात :**

एकूण क्षेत्र :- ५ ते ६ एकर (द्राक्ष बागेतील आंतरपीक).

लागवड खर्च :- केवळ २५ हजार रुपये प्रति एकर.

अपेक्षित उत्पन्न :- १० ते १२ लाख रुपये.

प्रमुख पिके :- गॅलन वांगी, पंचगंगा वांगी, टोमॅटो आणि भोपळा.

# ठाणे शहराचे नाव लंडन वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये !

## ठाणेकरांसाठी अभिमानाची बाब – महापौर शर्मिला पिंपळोलकर



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१४, ठाणे :** ठाण्यातील अवघ्या ७ वर्षांच्या रियांश सानिका दीपक खामकरने अरबी समुद्रात ३० किमी एकट्याने पोहून विश्वविक्रम प्रस्थापित केला. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी ७ तास ३० मिनिटे ११ सेकंदांत हे अंतर पोहून पूर्ण केलेल्या त्यांच्या पराक्रमाची नोंद लंडन वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे. रियांश खामकरने 'स्टारफिश स्पोटर्स फाऊंडेशनचे प्रशिक्षक कैलाश आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे धडे घेत असून ठाणे महापालिकेच्या कै. मारोतराव शिंदे तरणतलाव येथे नियमित सराव करीत आहे. रेयांशच्या या यशामुळे ठाणे महापालिकेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असल्याचे सत्काराप्रसंगी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले.

यावेळी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते गोवा येथे हवाई बीच ते हवाई वेल्हा बीच येथे २६ जानेवारी २०२६ रोजी १० कि.मी सागरी अंतर पार केलेले जलतरणपटू आयुषी आखाडे, सुयश हिंदळेकर, ध्रिती कोळी, समिप्ता व्हावळ, रेयांश खामकर, ओजस मोरे, गार्गी भरणुके, सिद्ध मुपेनेट्टी, विवान गुरसुळे, समर्थ भिलारे यांचाही सन्मान करण्यात आला. तसेच जलतरणपटूंचे प्रशिक्षक कैलास आखाडे यांचाही सन्मान करण्यात आला.

यापूर्वी रियांशने विजयदुर्ग येथील अरबी समुद्रात मालपे जेट्टी ते वाघोटन जेट्टी हे १५ किलोमीटरचे आव्हानात्मक सागरी अंतर तीन तासात पोहून पार केले आहे. १५ कि.मीचे अंतर पार करणारा रेयांश खामकर हा सर्वात लहान जलतरणपटू ठरला आहे. त्याची दखल इंडिया बुक रेकॉर्डने घेतली आहे.

रेयांश खामकर हा स्टारफिश स्पोर्टस फाऊंडेशनच्या माध्यमातून जलतरणाचे धडे प्रशिक्षक कैलास आखाडे यांच्याकडून घेतो. रेयांश ठाणे महापालिकेच्या मारोतराव शिंदे तरणतलाव येथे दररोज सराव करतो. रेयांश हा ठाण्यातील नौपाडा येथील सरस्वती इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा विद्यार्थी आहे. गेल्या वर्षभरात विविध स्पर्धामध्ये रेयांशने १३ पदके प्राप्त केली आहेत, त्यात ५ सुवर्ण, ५ रौप्य व ३ कांस्य पदकांचा समावेश आहे.

२ जून २०२४ मध्ये ठाणे येथे झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत २५ मीटर बटरफ्लाय विथ फिन्स स्पर्धेत त्याने सुवर्णपदक तर ५० मीटर फ्रीस्टाईल विथ फिन्समध्ये कांस्य पदक प्राप्त केले आहे. ६ जुलै २०२४ रोजी कोल्हापूर येथे झालेल्या महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा या त्रिराज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत त्याने ५० मीटर बॅकस्ट्रोक मध्ये सुवर्णपदक प्राप्त केले आहे. १७ ते १८ ऑगस्ट २०२४ रोजी बँकॉक, थायलंड येथे झालेल्या आशियाई ओपन स्कूल्स स्विमिंग चॅम्पियनशिपमध्ये रेयांशने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. तो महाराष्ट्र एक्वाटिक असोसिएशनने निवडलेल्या १५ जलतरणपटूंपैकी एक असून, त्याने आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. ६ वर्षांखालील मुलांच्या गटात २५ मीटर फ्रीस्टाइल किकबोर्डमध्ये रौप्य पदक, २५ मीटर फ्री स्टाईलमध्ये कांस्य पदक, ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये कांस्य पदक, २०० मीटर फ्री स्टाईल रिलेमध्ये रौप्य पदक प्राप्त केले आहे.

१५ सप्टेंबर २०२४ मध्ये अंडरवॉटर स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र द्वारा आयोजित केलेल्या चौथ्या महाराष्ट्र राज्य फिन स्विमिंग स्पर्धेत रेयांशने ५० मीटर मोनोफिन सरफेस स्विमिंगमध्ये सुवर्णपदक, १०० मीटर बायफिन मिश्र रिलेमध्ये सुवर्णपदक, ५० मीटर बायफिन स्विमिंगमध्ये रौप्यपदक पटकाविले. सदरची स्पर्धा ही ८ वर्षे व त्यावरील वयोगटासाठी होती, परंतु रेयांशने आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेत केलेली कामगिरी लक्षात घेऊन ९ वर्षे या वरिष्ठ वयोगटात सहभागी होण्यासाठी त्याला विशेष प्रवेश देण्यात आला होता, ज्यामध्ये त्याने ९ वर्षांखालील जलतरणपटूंशी स्पर्धा केली. ९ ऑक्टोबर २०२४ रोजी विबग्योर हायस्कूल खारघर येथे झालेल्या १६ व्या व्हिवा इंटरस्कूल जलतरण स्पर्धेत रेयांशने २० मीटर बटरफ्लायमध्ये सुवर्णपदक आणि २० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये रौप्य पदक प्राप्त केले.

# माजी आ. भोईर यांच्या प्रयत्नाने दोस्ती गृहसंकुल रस्त्याच्या कामाला सुरुवात...



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१४, शिळफाटा (ठाणे) :** शिळफाटा दोस्ती गृहसंकुलात शेकडो नागरिक राहतात तसेच येथे दोस्ती फाउंडेशन शाळा असून गृहसंकुलाकडे जाणाऱ्या रस्त्याची दूरवस्था झाली होती. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन माजी आमदार सुभाष भोईर यांच्या प्रयत्नाने दोस्ती गृहसंकुलातील रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली.नागरिकांना व विद्यार्थ्यांना या संकुलातील धुळीचा व खड्ड्यांचा त्रास सहन करावा लागत होता. ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ प्रचारादरम्यान नागरिकांनी या रस्त्याची तक्रार माजी आमदार सुभाष भोईर यांच्याकडे केली होती. याची दखल घेत शिळफाटा येथे असलेल्या प्लॅनेट नॉर्थ दोस्ती गृहसंकुलातील नागरिकांना मुंब्रा-पनवेल मुख्य रस्ता ते गृहसंकुलापर्यंत रस्ता दुरुस्त करून देण्याचे आश्वासन माजी आ. सुभाष भोईर यांनी दिले होते. त्यानुसार निवडणूक संपताच दोस्ती गृहसंकुलातील नागरिकांना दोस्ती ग्रुपमार्फत ३५० मीटरचा काँक्रीट रस्ता मंजूर करून त्याचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी सुमित भोईर, आरिफ शेख, जावेद शेख, शमशुनिषा हुसेन, फईम शेख, हनीफ पठाण, ॲड. तन्वीर, ॲड. मुफ्ती, अनवर कच्छी, दोस्ती गृहसंकुलातील, रुबी, एल्मेर, जेड, एमरॉल्ड सोसायटीचे सर्व अध्यक्ष, सेक्रटरी, सदस्य व नागरिक, दोस्ती ग्रुपचे वरिष्ठ अभियंता श्रीपत, सुधीर चव्हाण उपस्थित होते.

# थोडक्यात

## १ मार्च ला चंद्रपूरात तेलूगु कवी संमेलन आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१३, चंद्रपूर : महाराष्ट्र राज्य तेलुगु साहित्य अकादमी द्वारे आयोजित तेलुगू कवी संमेलन आणि सांस्कृतिक कार्यक्रम रोज रविवार, दि.०१ मार्च २०२६ ला सकाळी १०.०० ते ३.०० या वेळेत स्थानिक एन.डी.होटल हॉल, बापट नगर चौक, चंद्रपूर येथे आयोजन करण्यात आले आहे.

माजी सांस्कृतिक कार्यमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांचे कारकीर्दीत अनेक वर्षापासून विविध भाषावार समाजानी केलेले मागणी नुसार बहुभाषिक लोकाना आपले मुळ भाषा अवगत ठेवून सदर भाषेचे जतन व संवर्धन करण्यास, महाराष्ट्रातील विविध भाषावार संस्कृती, परंपरागत, लिखित, मौखिक कला, साहित्य, वाङ:मय, कविता, निबंध, लेख, असे विविध कला वृद्धिंगत करणे व नव साहित्य निर्माण करण्यास नवोदित संगीत, कला, वाङ:मय, साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील कुशल कार्यात्मक सृजनशील नवोदित कवी, लेखक, गायक, संगीतकार, नृत्य क्षेत्रातील व्यक्तींना हक्काचे मंच निर्माण करणे आणि कुठेही राहुन आपले मुळ भाषा व संस्कृती जतन करुन वृद्धिंगत करणे ह्या उद्दात हेतुने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य मंत्रालयाने दोन वर्षांपुर्वी विविध भाषा साहित्य अकादमी स्थापन करून त्यात तेलुगू साहित्य अकादमी /महामंडळही स्थापन करण्यात आले. या महामंडळ/अकादमी द्वारे उपरोक्त उदात् उद्देशासाठी महाराष्ट्र राज्यातील विविध तेलुगु समाज बहुल जिल्ह्यात कवी संमेलन आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. याचाच एक भाग शासकीय नियोजनात आयोजित कार्यक्रमात सांस्कृतिक कार्य मंत्रालय मंत्री/ प्रतिनिधी, स्थानिक आमदार, लोक प्रतिनिधी, सदर विभागाचे संचालक / सहसंचालक, अधिकारी तसेच तेलुगू भाषिक उच्च पदस्थ अधिकारी आणि तेलुगु भाषा अवगत विविध समाजातील नेते, सदर समाज संघटनेचे अध्यक्ष व सचिव यांचे प्रातिनिधिक स्वरुपातील मान्यवरांचे उपस्थितीत कवी संमेलन आणि श्रीचरण नृत्य अकादमी चंद्रपूर चे प्रशांत कत्तुरवार यांचे नृत्य संचलन सहकार्यातून सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात आयोजन करण्यात येत आहेत.

या कार्यक्रमात सांस्कृतिक नृत्य आणि कवी संमेलनात सादरीकरणात सहभाग होणारे सृजनशील कवी व लेखक, कलाकार यांना(कवीता, काव्य सादरीकरणास ३ ते ४ मिनीटे वेळ, समुह नृत्य सादरीकरणात ५-७ मिनिट वेळ राहणार) यात सहभाग घेणारे व्यक्तिना व समुहाला यथोचित मानधन व प्रशस्तिपत्र प्रदान करून गौरविण्यात येणार आहेत. तेव्हा तेलुगू साहित्य , कला, सांस्कृतिक नृत्य क्षेत्रातील इच्छा असलेल्या महाराष्ट्र राज्यातील सृजनशील व्यक्तींनी २५ फेब्रुवारीपर्यंत खालील संपर्क क्रमांक असलेल्या भ्रमणध्वनीवर संपर्क करुन आपले कार्यक्रम सादरीकरण हे कवी संमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम बाबत चौकशी करून कवी संमेलनात वैयक्तिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य प्रकारात आगाऊ नोंद करून घ्यावेत असे आवाहन राज्य तेलुगू अकादमी आणि आयोजन समिती / समन्वयका द्वारे जाहीर करण्यात येत आहेत .सहभाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी महाराष्ट्र राज्य तेलुगु साहित्य अकादमी मुंबई कार्यालय (०२२-२२६७२५३९) आणि राज्य समन्वयक महाराष्ट्र तेलुगु समाज फेडरेशन जगनबाबू गंजी ७७१८८२५५०३, अशोक कांटे ९९२०१५५७०२ तसेच चंद्रपूर जिल्हा तेलुगु भाषिक तथा विदर्भ तेलुगू समाज संघम समन्वयक आनंदराव वाय.अंगलवार ८३२९५४९९४७ यांचेशी संपर्क करून आपले सादरीकरण नोंदवून घेण्यात यावे.असे जाहीर करण्यात येत आहे.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी लोकल ट्रेनमध्ये तातडीने अतिरिक्त डबे सुरू करा - वल्ली राजन यांची मागणी



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१४, डोंबिवली(ठाणे) :** १२वीच्या परीक्षेसाठी जात असताना गर्दीच्या लोकल ट्रेनमधून पडून १८ वर्षीय विद्यार्थी स्व. सचिन काथरे याचा झालेला दुर्दैवी मृत्यू हा केवळ अपघात नसून, उपनगरीय रेल्वे व्यवस्थेतील गंभीर दुर्लक्ष आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेप्रती असलेल्या बेफिकिरीचे द्योतक असल्याची तीव्र प्रतिक्रिया वल्ली राजन, राज्य सचिव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार यांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर कल्याण रेल्वे स्टेशन व्यवस्थापकांना निवेदन देत त्यांनी परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त लोकल गाड्या व स्वतंत्र, सुरक्षित डबे तातडीने सुरू करण्याची ठोस मागणी केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विमुक्त भटक्या जमाती सेलचे कल्याण जिल्हाध्यक्ष दिनेश परदेशी तसेच समाजसेवकतोषेश लक्ष्मीपती शुक्ला उपस्थित होते.दरवर्षी परीक्षा काळात हजारो विद्यार्थी प्रचंड गर्दीत, जीव मुठीत धरून लोकलने प्रवास करतात. ही परिस्थिती प्रशासनाला ज्ञात असतानाही ठोस उपाययोजना होत नसणे अत्यंत दुर्दैवी आहे, असे नमूद करत वल्ली राजन यांनी वरिष्ठ नागरिक व दिव्यांगांसाठी जशा विशेष सुविधा आहेत, त्याच धर्तीवर किमान १२वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र व सुरक्षित डींविशपीं डशिलळरश्र ऊेरिऑांशपीं सुरू करणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले.

**मुख्य मागण्या :-** परीक्षा कालावधीत अतिरिक्त लोकल गाड्या किंवा डबे तातडीने सुरू करावेत.१२वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र व सुरक्षित डबे लागू करावेत.पीक अवर्समध्ये गर्दी नियंत्रणासाठी विशेष नियोजन व अंमलबजावणी करावी.मानवी जीवन हे कोणत्याही व्यवस्थेपेक्षा मौल्यवान आहे. आणखी कोणत्याही विद्यार्थ्याचा बळी जाण्याआधी प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, असा इशाराही वल्ली राजन यांनी दिला.

## रॉटरी क्लबच्या माध्यमातून स्वच्छता गृहाचे उद्घाटन संपन्न




**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१४, डहाणू (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील रानशेत येथे असलेल्या शिक्षण प्रसारक मंडळ, रानशेत आश्रम शाळा येथे नव्याने उभारण्यात आलेल्या दर्जेदार स्वच्छता गृहाचे उद्घाटन दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडले. रानशेत येथे सन १९६३ साली प्राथमिक शाळेची सुरुवात अत्यंत मोजक्या साधनसामग्रीसह कुडाच्या घरात करण्यात आली होती. त्या काळात अनेक विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण केले. कालांतराने शाळेने शैक्षणिक वाटचाल करत हजारो विद्यार्थी घडवले असून आज ते विविध क्षेत्रात नोकरी व व्यवसाय करत आहेत. या स्वच्छता गृहामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्य व स्वच्छतेला चालना मिळणार असून शैक्षणिक वातावरण अधिक सुदृढ होणार असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.